# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.

ई-मेल: mercindia@mercindia.org.in संकेत स्थळ www.mercindia.org.in

## प्रसिध्दी-पत्रक

## (महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या सन २०११ च्या प्रकरण क्र. १५१ मधील दिनांक २२ ऑगस्ट , २०१२ चा आदेश )

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग) सन २००९ च्या प्रकरण क्र. ५० मध्ये १५ ऑक्टोबर, २००९ रोजी विद्युत अधिनियम, २००३च्याक लम ९४(२) अंतर्गत एक अंतरिम आदेश पारित केला. या आदेशाद्वारे, टीपीसी-वितरण आणि आरइन्फ्रा- वितरण या दोन्ही परवानाधारकांच्या परवाना क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा स्वस्त दराने करता येणे शक्य व्हावे यासाठी एका वितरण परवानाधारकाकडून दुसऱ्या वितरण परवानाधारकाकडे ग्राहकाला चेंजओव्हर करणे सोपे जावे म्हणून चर्चेद्वारे सर्वानुमते एक पध्दत आखून देण्यात आली. अशा प्रकारे वीज उद्योगात स्पर्धा सुरु करण्याचे दीर्घकालीन उद्दिष्ट साध्य करण्यात आले.

आरइन्फ्रा-वितरणने आयोगापुढे सादर केलेल्या याचिकेत असा आरोप केला की आरइन्फ्रा-वितरणकडून टीपीसी-वितरणकडे ग्राहकांच्या चेंजओव्हरला परवानगी देताना, टीपीसी-वितरण, फक्त मोठ्या ग्राहकांची निवड करते. त्याचप्रमाणे आपले स्वत:चे विद्युत जाळे निवडक क्षेत्रात उभारुन सर्वांना विजेचा पुरवठा करण्याच्या बंधनाचे पालन करीत नाही. आयोगाने या याचिकेबाबत, प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या सुनावणीच्या वेळी आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरणला संबंधित माहिती सादर करण्याचे निर्देश दिले.

आयोगाने “चेंजओव्हर ग्राहक” आणि “स्विचओव्हर ग्राहक” या दोन संज्ञांचा वापर दि. २२ ऑगस्ट, २०१२ च्या आदेशात केला असून त्यांची व्याख्या खालीलप्रमाणे करण्यात आली आहे:-

**चेंजओव्हर ग्राहक :** म्हणजे जे ग्राहक एका वितरण परवानाधारकाच्या वितरण जाळ्यातून विजेचा पुरवठा घेत होते व ज्यांनी दुसऱ्या वितरण परवानाधारकाकडून विजेचा पुरवठा घेण्यासाठी स्थलांतर केले आहे परंतु ज्यांची जोडणी मात्र पहिल्या परवानाधारकाच्या वितरण जाळ्याशी अद्यापही जोडलेली आहे.

**स्विचओव्हर ग्राहक :** म्हणजे जे ग्राहक वितरण परवानाधारकाच्या वितरण जाळ्यातून विजेचा पुरवठा घेत होते व ज्यांनी विजेचा पुरवठा घेण्यासाठी दुसऱ्या वितरण परवानाधारकाकडे स्थलांतर केले असून ते या दुसऱ्या वितरण परवानधारकाच्या जाळ्यामधून विजेचा पुरवठा घेत आहेत.

आयोगाने या प्रक्रियेत अनेक मुद्दे निश्चित करुन त्यासंबंधी आपले मुद्देनिहाय विश्लेषण आणि निर्णय देखील या आदेशामध्ये दिले आहेत :-

- टीपीसी-वितरण कायद्यान्वये त्यांच्यावर आलेल्या जबाबदारीस अनुसरुन सर्व पात्र ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी त्यांच्याकडून आलेले सर्व परिपूर्ण अर्ज न स्विकारता, आरइन्फ्रा-वितरणकडून टीपीसी-वितरणकडे चेंजओव्हर करणाऱ्या ग्राहकांची छाननी करण्याचा टीपीसी-वितरण प्रयत्न करीत आहे. यावरुन या चेंजओव्हर प्रक्रियेत टीपीसी-वितरणकडून फक्त मोठ्या ग्राहकांची निवड करण्यात येत असल्याचे निर्देशित होते. कारण टीपीसी-वितरणकडून सबसिडी देऊ शकणाऱ्या फक्त मोठ्या ग्राहकांचा (ज्यांचा विजेचा वापर मोठ्या प्रमाणावर आहे) स्वीकार करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

- टीपीसी-वितरणकडून निवासी वर्गवारीतील ग्राहकांखेरीज अन्य निवडक प्रभागातील, जरी अशा प्रभागांच्या सभोवतील चेंजओव्हर ग्राहक असले तरी, ग्राहकांकरिता वितरण-जाळे उभारण्यात येत आहे. टीपीसी-वितरणने एका स्विचओव्हर ग्राहकासाठी वितरण जाळे उभारताना अशा ग्राहकाच्या सभोवताली उर्वरित चेंजओव्हर ग्राहकांककरिता वितरण जाळे उभारले नाही.

- आयोगाचे असे मत आहे की, टीपीसी-वितरणची वरील कारवाई हेतूपुरस्सर करण्यात येत आहे किंवा ग्राहकांच्या होणाऱ्या स्थलांतरामुळे करण्यात येत आहे हे महत्वाचे नसून त्यामागचा कल महत्वाचा आहे कारण या कलामुळे वितरण परवानाधारकांना विकासाची समान संधी उपलब्ध होत नसून त्यामुळे समान क्षेत्र असणाऱ्या दोन वितरण परवानाधारकांमध्ये स्पर्धेच्या वाढीस पोषक वातारण निर्माण होत नाही.

- टीपीसी-वितरण कंपनी ही वितरण परवानाधारक आहे यास मान्यता दिल्याबाबतचा निकाल मा. सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर चार वर्षे होऊनही टीपीसी-वितरणने निश्चित केलेल्या त्यांच्या वितरण क्षेत्रातील १२ क्लस्टर्समध्ये अद्याप वितरणाचे जाळे न उभारल्यामुळे, सर्वांना विजेचा पुरवठा करण्याच्या बंधनाचे टीपीसी-वितरणने पालन केलेले नाही.

त्यामुळे आयोग अशा निष्कर्षाप्रत आले की, आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरण यांच्या समान पुरवठा क्षेत्रातील विजेचा कमी वापर करणाऱ्या ग्राहकांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी आणि विद्युत वितरण कंपन्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन

देण्याकरिता, ग्राहकांच्या चेंजओव्हरची आणि स्विचओव्हरची प्रकरणे विद्युत कंपन्यांकडून ज्या रितीने हाताळण्यात येत आहेत, त्यामध्ये हस्तक्षेप करण्याची गरज आहे.

त्याचप्रमाणे, एका वितरण परवानाधारकाकडून दुसऱ्या वितरण परवानाधारकाकडे, सध्या अस्तित्वात असलेल्या वितरण जाळ्याचा वापर करुन, ग्राहकांनी स्थित्यंतर करण्याची योजना, देशात राबविण्याचा प्रयत्न प्रथमच करण्यात येत असल्याची येथे नोंद घेणे आवश्यक आहे. त्यानुसार, ग्राहकांना वीज पुरवठा घेण्याकरिता वितरण पुरवठादार निवडण्याचे स्वातंत्र्य उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याची खात्री करण्याकरिता, आयोग, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ९४ (२) अंतर्गत, सन २००९ च्या प्रकरण क्र. ५० मधील अंतरिम आदेशात, **या आदेशाच्या दिनांकापासून पुढील एक वर्षाच्या कालावधीकरिता,** खालीलप्रमाणे बदल करीत आहे:-

एक) या आदेशाच्या दिनांकापासून, आरइन्फ्रा-वितरण कडून टीपीसी-वितरण कडे फक्त निवासी वर्गवारीतील आणि ते देखील ज्या ग्राहकांचा विजेचा वापर प्रत्येक महिन्यास ३०० युनिट्सपर्यंत किंवा ३०० युनिट्स (अर्ज सादर करण्याच्या दिनांकाच्या दिवशी मागील बारा महिन्यांतील विजेचा 'सरासरी' मासिक वापर आणि आरइन्फ्रा-वितरणच्या शेवटच्या अदा करण्यात आलेल्या मासिक देयकानुसार) असेल, फक्त अशाच ग्राहकांच्या चेंजओव्हरला आणि ग्राहकांच्या स्विचओव्हरला परवानगी देण्यात येईल.

दोन) ज्या ग्राहकांचे चेंजओव्हरसाठीचे अर्ज (या आदेशाच्या दिनांकाच्या दिवशी) प्रलंबित असतील, अशा ग्राहकांची ग्राहक-वर्गवारी आणि त्यांच्या विजेच्या वापराचा टप्पा कोणताही असला तरी, अशा अर्जांना हा निर्बंध लागू राहणार नाही आणि अशा अर्जांवरील प्रक्रिया १५ ऑक्टोबर २००९ च्या अंतरिम आदेशात मान्यता दिलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल आणि पात्र ग्राहकांचे चेंजओव्हर सुरळीतपणे पार पाडण्यात येईल.

तीन ) टीपीसी - वितरण जोपर्यंत आपल्या क्षेत्रात स्वत:च्या वितरण जाळ्याचा विकास करीत नाही तोपर्यंत, ज्या ग्राहकांनी या आदेशाच्या दिनांकापूर्वी टीपीसी - वितरणकडे चेंजओव्हर केलेले आहे किंवा ज्यांनी या आदेशाच्या दिनांकापूर्वी अर्ज सादर केला असून जे चेंजओव्हरसाठी पात्र ठरले आहेत अशा चेंजओव्हर ग्राहकांना, टीपीसी-वितरणकडून आरइन्फ्रा-वितरणच्या जाळ्याचा वापर करुन विजेचा पुरवठा करण्यात येईल.

चार) वर करण्यात आलेल्या बदलांखेरीज, आयोगाने सन २००९ च्या प्रकरण क्र. ५० मध्ये दि. १५ ऑक्टोबर, २००९ च्या अंतरिम आदेशात आयोगाने मान्यता दिलेल्या कार्यपध्दतीमधील अन्य सर्व बाबी कायम राहतील.

पाच) या आदेशात देण्यात आलेल्या निर्देशांनुसार, टीपीसी-वितरणने त्यांच्या वीज पुरवठ्यासाठी करावयाच्या अर्जाच्या नमुन्यात तातडीने बदल करावेत.

सहा) सध्या चेंजओव्हर झालेले आणि ज्या ग्राहकांनी चेंजओव्हरकरिता यापूर्वीच अर्ज केला आहे आणि जे पात्र आहेत अशा सर्व ग्राहक वर्गवारीतील ग्राहकांकरिता, समान परवाना क्षेत्रात वितरणाचे जाळे स्थापन करण्यात आल्याच्या दिनांकापासून, आरइन्फ्रा-वितरणकडून टीपीसी-वितरणकडे स्विचओव्हर करण्यासाठी परवानगी असेल.

सात) ज्या ग्राहकांनी आरइन्फ्रा-वितरण कडून टीपीसी-वितरणकडे चेंजओव्हर केलेले आहे आणि जे भविष्यात चेंजओव्हर करतील आणि टीपीसी-वितरणचे थेट ग्राहक, हे आयोगाने सन २००९ च्या प्रकरण क्र. ५० मध्ये दि. १५ ऑक्टोबर, २००९ च्या अंतरिम आदेशात आयोगाने मान्यता दिलेल्या कार्यपध्दतीनुसार, टीपीसी-वितरणकडून आरइन्फ्रा-वितरणकडे चेंजओव्हर करु शकतील.

आठ) आयोगाकडून टीपीसी-वितरणच्या ग्राहकांच्या संख्येत (चेंजओव्हर/स्विचओव्हर व नवीन जोडण्या आणि, आरइन्फ्रा-वितरणकडे होणारे स्थलांतर, असल्यास), होणाऱ्या वाढीच्या प्रक्रियेचा आढावा तिमाही तत्वावर (जून, सप्टेंबर, डिसेंबर, मार्च) करण्यात येईल आणि आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरण यांना संबंधित तिमाही संपल्यानंतरच्या पहिल्या महिन्याच्या अखेरीस सविस्तर माहिती सादर करावी लागेल.

नऊ) चेंजओव्हर आणि स्विचओव्हर व निश्चित केलेल्या क्षेत्रामध्ये (क्लस्टर्स) या एक वर्षाच्या कालावधीत देण्यात आलेल्या नवीन जोडण्यांबाबतचा आढावा, एक वर्षानंतरच्या काळात या मार्गावर करावयाच्या पुढील वाटचालीबाबत निर्णय घेण्यापूर्वी, आयोगाकडून घेण्यात येईल.

आयोगाने स्पष्ट केले आहे की, टीपीसी-वितरणला नजिकच्या काळात समान वितरण क्षेत्रात आपले स्वत:चे वितरण जाळे उभे करणे आवश्यक आहे आणि आरइन्फ्रा-वितरणच्या सध्याच्या वितरण जाळ्याचा उपयोग हा केवळ एक तात्पुरता उपाय म्हणून, जोपर्यंत टीपीसी-वितरणकडून स्वत:चे वितरण जाळे उभारण्यात येत नाही तोपर्यंतच करावयाचा आहे. तसेच कोणत्याही परिस्थितीत वितरण जाळ्याची उभारणी फक्त निवडक क्षेत्रातच करण्याची परवानगी देण्यात येणार नाही. त्यानुसार, सर्वांना वीज पुरवठा करण्याच्या बंधनाची पूर्तता करणे टीपीसी-वितरणला शक्य व्हावे याकरिता टीपीसी-वितरणने येत्या एक वर्षात हाती घ्यावयाच्या भांडवली खर्चाच्या कामांसंबंधी आयागाने खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत :-

अ) टीपीसी-वितरणने त्यांच्या क्लस्टर्स-निहाय वितरण जाळे उभारण्यासाठी मान्यता देण्यात आलेल्या आराखड्याची फेरआखणी प्रभाग-निहाय वितरण जाळे उभारण्याच्या आराखड्यात करावी आणि हा आराखडा आयोगास या आदेशाच्या दिनांकापासून दोन आठवड्यात मान्यतेसाठी सादर करावा.

ब) टीपीसी-वितरणने, सर्व प्रयत्न करुन आणि आवश्यक तो भांडवली खर्च करुन, या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष संपण्यापूर्वी ११ क्लस्टर्समध्ये (मिरा रोड, दहिसर, कुर्ला एलबीएस, साकी, माईंड स्पेस, ट्रॉम्बे, मानखुर्द चेंबूर, वृंदावन, आरोग्यनिधी, वसंतोत्सव आणि मालाड बीएमसी लगून) संपूर्ण वितरण जाळ्याची उभारणी करण्याची खात्री करावी; ज्यामुळे टीपीसी-वितरणला या क्लस्टर्समधील क्षेत्रात कोठेही राहात असणाऱ्या सध्याच्या आणि भावी ग्राहकांना, आयोगाच्या वीज पुरवठा करण्याच्या कृतीच्या मानकांच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या किमान एक महिन्याच्या कालावधीच्या आत, टीपीसी-वितरण वीज पुरवठा स्वत:च्या वितरण जाळ्याचा वापर करुन करण्याच्या स्थितीत असेल, याची टीपीसी-वितरणकडून खात्री करण्यात येईल.

क) वरील उद्दिष्टाची पूर्तता करणे शक्य व्हावे याकरिता आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या सर्व भांडवली खर्चाच्या योजना या टीपीसी-वितरणच्या सर्वंकष वितरण जाळे उभारण्याच्या आराखड्याचा एक भाग असतील, याची टीपीसी-वितरणने खात्री करावी.

ड) या निश्चित करण्यात आलेल्या ११ क्लस्टर्समधील सर्व ग्राहकांना याची माहिती व्हावी याकरिता टीपीसी-वितरणने या कामास मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी द्यावी.

आयोगाने टीपीसी-वितरण आणि आरइन्फ्रा-वितरण यांना असे निर्देश दिले की त्यांनी, ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीकोनातून, कामकाजात येणाऱ्या अडचणींचे निराकरण परस्पर चर्चेतून करावे आणि मुंबई शहरात सध्या प्रचलित असलेली समांतर परवाना पध्दती यशस्वी होईल, याची खात्री करावी.

आयोगाने या आदेशात क्रॉस सबसिडी अधिभार आणि नियामक मत्ता अधिभार या बाबी लागू करण्याबाबत निर्णय दिलेला नाही, कारण या बाबी सध्या मा. विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे प्रलंबित आहेत.

त्याशिवाय, जेव्हा आरइन्फ्रा-वितरणचे, विजेचा वेगवेगळ्या पातळीवर वापर असणारे, निवासी ग्राहक टीपीसी-वितरणकडे स्थलांतरित होतील तेव्हा, चेंजओव्हर प्रक्रियेला गती यावी आणि या प्रक्रियेमुळे होणाऱ्या बचतीची अधिक माहिती निवासी ग्राहकांना उपलब्ध व्हावी यासाठी आयोगाच्या कार्यालयाने दर महिन्यास खर्चात होणारी बचत रुपयामध्ये तसेच टक्केवारीत देखील काढली असून ती खालील तक्त्यात दाखविण्यात आली आहे:

**तक्ता : वीज वापराच्या वेगवेगळ्या पातळीसाठी मासिक देयकातील बचत -**

| एल टी १ वर्गवारी (सिंगल फेज) | एकूण मासिक देयक (रु.) | | | आरइन्फ्रा-डी देयकाच्या संदर्भात बचत (रु.) | | आरइन्फ्रा-डी देयकाच्या संदर्भात बचत (%) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सरासरी मासिक वापर (युनिट्स) | आरइन्फ्रा-डी बरोबर राहिलेले | चेंजओव्हर ग्राहक (आरइन्फ्रा-डी च्या वायरवरुन टीपीसी-डी कडे स्थलांतरित झालेले) | स्विचओव्हर ग्राहक (टीपीसी-डी च्या वायरवरुन टीपीसी-डी कडे स्थलांतरित झालेले) | चेंजओव्हर ग्राहक (आरइन्फ्रा-डी च्या वायरवरुन टीपीसी-डी कडे स्थलांतरित झालेले) | स्विचओव्हर ग्राहक (टीपीसी-डी च्या वायरवरुन टीपीसी-डी कडे स्थलांतरित झालेले) | चेजओव्हर ग्राहक (आरइन्फ्रा-डी च्या वायरवरुन टीपीसी-डी कडे स्थलांतरित झालेले) | स्विचओव्हर ग्राहक (टीपीसी-डी च्या वायरवरुन टीपीसी-डी कडे स्थलांतरित झालेले) |
| ५० युनिट | २१२ | १५५ | ११५ | ५७ | ९७ | २७% | ४६% |
| ७५ युनिट | ३०१ | २१५ | १५६ | ८६ | १४५ | २९% | ४८% |
| १०० युनिट | ३९० | ३१८ | १९६ | ७१ | १९४ | १८% | ५०% |
| १५० युनिट | ७४० | ५५० | ४०१ | १९० | ३३९ | २६% | ४६% |
| २०० युनिट | १०६७ | ७८२ | ५८४ | २८५ | ४८४ | २७% | ४५% |
| २५० युनिट | १३९५ | १०१४ | ७६६ | ३८१ | ६२९ | २७% | ४५% |
| ३०० युनिट | १७२२ | १३२५ | ९४८ | ३९७ | ७७४ | २३% | ४५% |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, ३०० युनिट्सपेक्षा कमी वापर असणाऱ्या निवासी ग्राहकांनी आरइन्फ्रा-वितरणकडून टीपीसी-वितरणकडे स्थलांतर केल्यास, चेंजओव्हर ग्राहकांच्या बाबतीत १८ % ते २९% बचत होऊ शकेल आणि बचतीचे हे प्रमाण स्विचओव्हर ग्राहकांच्या बाबतीत त्यांच्या प्रत्यक्ष वापरानुसार, ४५% ते ५०% पर्यंत देखील वाढू शकेल. निवासी ग्राहकांनी या संधीचा लाभ घेऊन त्यांच्या विजेवर होणाऱ्या मासिक खर्चात कपात करावी यासाठी आयोग प्रयत्नशील आहे.